# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १५-२२** **दिनांक १५/०१/२०२२**

**गुगल-पे व्दारे पैसे स्वीकारुन वेश्याव्यवसाय करणा-या महिला व पुरुष दलाल यांच्यावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.**

दिनांक १३.०१.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाचे वपोनि. श्री पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, नालासोपारा येथे राहणारी महिला नामे दिपाली मारु व तिचा साथीदार संतोष उर्फ सॅन्डी हे वेश्यागमनाच्या मोबदल्यात गुगल-पे व्दारे पुरुष गि-हाईकांकडुन पैसे स्वीकारुन वसई-विरार व नालासोपारा परिसरातील लॉजमध्ये मुली पाठवितात अशी माहिती मिळाल्याने, मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पाटील यांनी बोगस गि-हाईक व पंच यांना आराम हॉटेल, सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, नालासोपारा पश्चिम, ता.वसई, जि.पालघर या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह छापा टाकला असता महिला वेश्यादलाल दिपाली राजेश मारु या महिलेने बोगस गि-हाईकाकडुन वेश्यागमनाच्या मोबदल्याची रक्कम रुपये १,०००/- कमीशन म्हणुन गुगल-पे व्दारे आगाऊ स्वीकारुन तिचा साथीदार संतोष उर्फ सॅन्डी याच्या मदतीने ०३ पिडित मुलींना वरील नमुद हॉटेल येथे पाठवुन वेश्यागमनाच्या मोबदल्याची उर्वरित रक्कम १,०००/- रु. पिडित मुलीच्या वतीने स्वीकारल्याचे निष्पन्न झाल्याने ०३ पिडित मुलींची सुटका करुन महिला वेश्यादलाल १) दिपाली दिपाली राजेश मारु व तिचा साथीदार २) संतोष उर्फ सॅन्डी दिलीप बंगाल, वय-३६ वर्ष, रा. रुम नं. ३०२, साई आशिर्वाद बिल्डींग, विमल बिल्डींग समोर, यशवंत गौरव, नालासोपारा (प.) ता. वसई जि. पालघर यांना ताब्यात घेतले. सदर बाबत पोहवा/९२०३३ उमेश हरी पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीतांविरुध्द नालासोपारा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I १३/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप. आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) मि. भा. व. वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./९२०३३ उमेश पाटील, पोहवा/९५००८ रामचंद्र पाटील, पोशि/१२११८ केशव शिंदे, मपोना/०३०१५ वैष्णवी यंबर व चालक पोना/२६३८ गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

----ooo----